जा.क्र.उमाशि-३/पुवि/११ वी कें.प्र./२०१५
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : २०/८/२०१५
20 AUG 2015

प्रति,

प्राचार्य/मुख्याध्यापक,
सर्व कनिष्ठ महाविद्यालये,
पुणे शहर व पिंपरी-चिंचवड परिसर.

**विषय : इ. ११ वी केंद्रीय प्रवेश सन २०१५-१६ प्रवेशाबाबतची ६ वी फेरी .**

पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील सन २०१५-१६ साठी सर्व उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाचे इ. ११ वी वर्गातील प्रवेश केंद्रिय प्रवेश समितीमार्फत पाच फे-यांद्वारे ऑनलाईन पध्दतीने करण्यात आले आहेत. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे आदेशानुसार ५ व्या फेरीनंतर गैरसोय झालेल्या तसेच जे विद्यार्थी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेत सहभागी झाले नव्हते. अशा सर्व विद्यार्थ्यांसाठी गरवारे कॉलेज येथे अर्ज मागविण्यात आले होते. अशा विद्यार्थ्यांसाठी दिनांक २०/८/२०१५ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत अर्ज स्विकारले आहेत.

**इ. ११ वी ऑनलाईन ६ व्या फेरीपूर्वी दिनांक २१/८/२०१५ रोजी सकाळी ११.०० ते २ पर्यंतच ५ व्या फेरीमध्ये दिलेले प्रवेश व रद्द झालेले प्रवेश काही कारणास्तव त्याचवेळी ऑनलाईन अपडेट करणे राहीले असल्यास ते सर्व उपरोक्त नियोजन वेळेत अपडेट करावेत त्यासाठी वेबसाईट वरील वेळत खुली करुन दिली जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.**

५ व्या फेरी पूर्वी फेरी क्रं. १ ते ४ मध्ये ऑनलाईन दिले गेलेले प्रवेश व रद्द झालेले प्रवेश तत्कालीन वेळेत अपडेट केले नसल्यास फेरीनिहाय सदरची माहिती भरुन या कार्यालयाच्या **dydpune@gmail.com** हया मेलआयडीवर मेल करणे. सदरच्या मेलप्रमाणे सर्व माहिती एमकेसीएल ला कळवून ऑनलाईन सिस्टिम मध्ये घेण्यात येईल. ऑफलाईन पद्धतीने प्रवेश देऊ नयेत.

रिक्त जागांवर गुणवत्तेनसार एमकेसीएल मार्फत ऑनलाईन पध्दतीने समुपदेशन करुन त्यांचे प्रवेश निश्चित करण्यासाठी इयत्ता ११ वी प्रवेशाची ६ वी फेरी घेण्यात येत आहे. ६ वी ऑनलाईन समुपदेशन फेरी अशी असणार आहेत.

१. ६ व्या फेरीसाठी अर्ज केलेल्या सर्व विद्यार्थ्यांची मेरीट लिस्ट एमकेसीएल मार्फत तयार केली जाईल.
२. मेरीट लिस्ट मधील मेरीट क्रमांकानुसार वेळ ठरवून देवून ऑनलाईन समुपदेशन फेरीसाठी विद्यार्थ्यांना एसएमएस पाठवीले जातील.
३. दिलेल्या वेळापत्रकानुसार, शाखा निहाय दिलेल्या ठिकाणी हॉलमध्ये विद्यार्थी व एक पालक यांनी समक्ष उपस्थित राहून आपला प्रवेश निश्चित करावयाचा आहे.
४. सदर ठिकाणी एलसीडी स्क्रीनवर प्रत्येक कॉलेजची शाखा व माध्यमनिहाय कट-ऑफ व रिक्त जागांचा तपशील दर्शविला जाईल.

५. रिक्त जागांवर गुणवत्तेप्रमाणे अलॉटमेंट करुन प्रवेशाची संगणीकृत पावती दिली जाईल.

६. वरीष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयांना अलॉटमेंट यादी ऑनलाईन पाठविली जाईल. आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाने आधी ऑनलाईन प्रवेश फेरीत दिलेल्या पध्दतीनेच ६ व्या फेरीचे नवीन प्रवेश देणे व रद्द करणे इ.कामे करावयावी आहेत.

७. पूर्वीचा प्रवेश रद्द करताना महाविद्यालयाने रु. २००/- नाममात्र शुल्क विद्यार्थ्यांने यापूर्वी भरलेल्या पूर्ण फी मधून कमी करुन उर्वरीत सर्व रक्कम विद्यार्थ्यांना तात्काळ परत करावी.

८. ६ व्या प्रवेश फेरीमध्ये दिला गेलेला प्रवेश कोणत्याही कारणास्तव रद्द करता येणार नाही याची सर्व विद्यार्थी व पालकांनी कळवावे

९. ६ व्या फेरीसाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांची मेरीट लिस्ट दिनांक २२/८/२०१५ व २३/८/२०१५ रोजी **http://pune.fyjc.org.in** व **www.dydepune.com** हया वेबसाईटवर प्रसिध्द केली जाईल तसेच सर्वांच्या माहितीसाठी महाविद्यालयांच्या ५ व्या फेरीनंतरच्या रिक्त जागा व कट-ऑफ प्रसिध्द करण्यात येतील त्यानुसारच ६ व्या ऑनलाईन समुपदेशन फेरीचे प्रवेश निश्चित केले जातील.

वरील सर्व बाबी विचारात घेऊन इ. ११ वी प्रवेशाबाबत कार्यवाही करावी.

सदरचे परिपत्रक या कार्यालयाच्या **www.dydepune.com** या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आले आहे.

(रामचंद्र जाधव)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१
तथा अध्यक्ष
इ. ११ वी केंद्रिय प्रवेश समिती,
पुणे – १.